।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

“ज्ञानतीर्थ” परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

“Dnyanteerth”, Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(b), NAAC Re-accredited with ‘B++’ Grade

## CONVOCATION SECTION

hone: (02462) 229294 ebsite: srtmun.ac.in mail: directorboee@gmail.com

जा क्र./दीक्षांत/२०२४–२५/ 1753 दिनांक : १३.०६.२०२४ 18

**प्रति,**

**मा. प्राचार्य,**

सर्व संलग्नीत महाविद्यालये,

**मा.संचालक विद्यापीठ संकूले नांदेड परीसर,**

**मा.संचालक उपकेंद्र लातूर, उपपरिसर परभणी ,**

**मा.प्राचार्य न्यु मॉडेल डिग्री कॉलेज,हिंगोली.**

**प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय : हिवाळी २०२३ च्या व उन्हाळी २०२४ च्या परीक्षेचे पदवी आवेदनपत्र स्विकारुन सादर करणे बाबत.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यांत येते की, प्रस्तुत विद्यापीठाचा **२७ वा दीक्षान्त** समारंभासाठी उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांकडून विहीत नमुन्यातील पदवी प्रमाणपत्रासाठी आवेदनपत्र मागविण्यात येत आहेत.

सर्व अभ्यासक्रमाच्या पदवी साठीचे आवेदनपत्र स्वीकारण्याचा कालावधी खालीलप्रमाणे आहे.

१) नियमित शुल्कासह **दि.२४ जून २०२४ ते २३ जुलै २०२४**

२) विलंबशुल्क रु.५०/– सह आवेदनपत्र दाखल करण्याचा कालावधी **दिं २४ जुलै २०२४ ते १४ ऑगस्ट २०२४ असा राहील.**

वरीलप्रमाणे दर्शविलेल्या **दि.२४ जून २०२४** पासून महाविद्यालय व विद्यापीठ संकूल/उपपरिसर लातूर, परभणी व मॉडल डीग्री कॉलेज हिंगोली स्तरावर **फक्त हिवाळी २०२३ व उन्हाळी २०२४ च्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्रासाठीचे आवेदनपत्र** स्वीकारण्यात यावेत. यासर्व विद्यार्थ्यांनी पदवी आवेदनपत्र online पध्दतीने भरणे आवश्यक आहे. सदरील आवेदनपत्र भरण्यासाठी विद्यापीठच्या www.srtmun.ac.in संकेतस्थळावर व examination विभागाअंर्तगत Convocation Section मध्ये लिंक उपलब्ध आहे.

पदवी आवेदनपत्र Online भरुन त्यांची एक प्रिंट संलग्नित महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या संबधित महाविद्यालयात व विद्यापीठ संकूलाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या संबधित विद्यापीठ संकूलात विहित शुल्काच्या पावतीसह आवेदनपत्र जमा करावी, आवेदनपत्रावरील विद्यार्थ्याच्या फोटोवर साक्षांकन केलेले व बाजूला एक अपलोड केलेल्याच फोटोची प्रत/कॉपी आवेदनपत्रावर लावलेली असणे आवश्यक आहे. फोटो हा पासपोर्ट साईजचा व Photo चा Background हा पांढ–या रंगाचाच असावा अन्यथा पदवी प्रमाणपत्रावर फोटो व्यवस्थित प्रिंट होणार नाही याची विद्यार्थ्यांना जाणीव/माहिती संबधित महाविद्यालयांनी करुन दयावी. विद्यार्थ्याचे नाव **मराठी व इंगजीमध्ये अचूक असणे आवश्यक आहे. त्याच बरोबर विद्यार्थ्याची स्वाक्षरी पण असणे अनिवार्य आहे.** पदवी आवेदनपत्र परीपूर्ण असल्याची खात्री करुनच विद्यार्थ्यांकडून आवेदनपत्र स्विकारावेत. **पदवी आवेदन पत्र भरतांना सर्व विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र ही महाविद्यालयाच्या पदवी वितरण कार्यक्रमातच भेटतील याबाबत सर्व विद्यार्थ्यांना अवगत करुन देण्यात यावे.**

महाविद्यालयांनी पदवी आवेदनपत्र स्विकारतांना पदवी प्रमाणपत्र शुल्क व्यवस्थित आकारल्याची/भरल्याची खात्री करुनच पदवी आवेदनपत्र व शुल्क स्विकारावे. पदवी आवेदनपत्र स्विकारण्याच्या विहीत मुदतीनंतर जिल्हानिहाय पदवी आवेदनपत्र व शुल्क जमा करण्याची कार्यवाही ही अंतिम तारखेनंतर ०५ दिवसाच्या आत करावयाची आहे. सर्व संलग्नित महाविद्यालयांनी स्विकारलेले पदवी आवेदनपत्र जिल्हानिहाय जमा करणे, शुल्काचा डी.डी.काढणे किंवा आरटीजीएस प्रणाली द्वारे विद्यापीठाच्या बॅंक खात्यामध्ये जमा करणे याबाबतचे वेळापत्रक लवकरच परीपत्रकाद्वारे सर्व संबधितास कळविण्यात येईल. विद्यापीठ परीसरातील सर्व शैक्षणिक संकुलांनी स्विकारलेले पदवी आवेदनपत्र व शुल्क भरण्याच्या अंतिम तारखेनंतर पाच दिवसाच्या आत परीक्षा व मूल्यमापन विभागातील दीक्षांत कक्षामध्ये सादर करावेत. पदवी शुल्काबाबतचे सूचनापत्रची एक प्रत सूचना फलकावर लावण्यासाठी सोबत जोडली आहे.

कृपया वरील सर्व सूचना/माहिती ही सर्व संबधितांच्या निदर्शनास आणुन द्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

**टिप:**

०१. **वर दर्शविलेल्या कालावधी मध्ये आवेदनपत्र भरलेल्या सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्र ही महाविद्यालयाच्या पदवी वितरण कार्यक्रमामध्येच मिळणार आहे. याची नोंद घ्यावी.**

०२. हिवाळी **२०२२ परीक्षेपूर्वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे** आवेदन पत्र महाविद्यालयांनी स्विकारु नयेत अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील दीक्षांत विभागात येवून Online पध्दतीने भरेलेले पदवी आवेदन पत्र विहीत शुल्कासह जमा करावयाचे आहेत. त्यांच्यासाठी विहित नमुन्यातील आवेदनपत्र भरण्यासाठीची लिंक सुध्दा वरील प्रमाणेच आहे.

०३. **उन्हाळी २०२४ च्या परीक्षा आवेदनपत्रासोबत पदवी आवेदनपत्र व पदवी प्रमाणपत्र शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा पदवी आवेदनपत्र भरण्याची गरज नाही.** तशी आवेदनपत्र महाविद्यालयांनी स्विकारु नयेत.

आपला,

(डॉ. दिगंबर एम. नेटके )
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत माहितीस्तव :—**

१ मा.कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२ मा. वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव:**

३ मा.संचालक, सर्व शैक्षणिक संकुल,प्रस्तुत विद्यापीठ.
४ विभाग प्रमुख सर्व प्रशासकिय विभाग,प्रस्तुत विद्यापीठ.
५ मा. संचालक, परभणी,लातूर उपकेंद्र प्रस्तुत विद्यापीठ.
६ प्राचार्य, न्यू मॉडेल,डिग्री कॉलेज,हिंगोली प्रस्तुत विद्यापीठ.
७ मा. संचालक, दुरशिक्षण विभाग प्रस्तुत विद्यापीठ.
८ सिनिअर प्रोग्रामर,प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परीपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.
९ मा. जनसंपर्क अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, आपल्यास्तरावरुन वृत्तपत्रामध्ये याबाबतची प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करावी.

।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(b), NAAC Re-accredited with 'B++' Grade
## CONVOCATION SECTION
Phone: (02462) 229294 website: srtmun.ac.in e-mail: directorboee@gmail.com

जा क्र./दीक्षांत/२०२४–२५/1753 दिनांक: १३/०५/२०२४ 18

**पदवी आवेदनपत्र सादर करणेबाबत विद्यार्थ्यांना सूचना**

१ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा २७ वा दीक्षान्त समारंभ लवकरच आयोजित करण्यात येणार आहे. समारंभाचा दिनांक व वेळेबाबत सूचना परीपत्रकाद्वारे व वृत्तपत्रांमधून प्रसिध्द करण्यात येईल.

२ **हिवाळी २०२३ व उन्हाळी २०२४** मध्ये घेण्यात आलेल्या सर्व परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी त्यांची पदवी ही महाविद्यालयस्तरावर पदवी वितरण कार्यक्रमात उपस्थित राहुन म्हणजेच **Presentia** मध्ये घेणे बाबत स्पष्ट अर्जामध्ये उल्लेख करणे आवश्यक आहे.

३ **हिवाळी २०२३ पूर्वीच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी** आपले पदवी आवेदनपत्र online भरुन त्याची प्रिंट घेवून **विद्यापीठात येवून पदवी आवेदनपत्र व शुल्क जमा करावे.** त्यांच्यासाठी आवेदन पत्रासोबत **रु. २००** नियमित शुल्क व प्रतिवर्ष विलंबशुल्क **रु.५०/–** प्रमाणे विद्यापीठात सादर केल्यानंतर त्यांना या दीक्षांत समारंभानंतर पदवी प्रमाणपत्र विद्यापीठात किंवा पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात येतील. (अशा विलंबाने पदवी आवेदनपत्र सादर करणा–या विद्यार्थ्यांच्या बाबतीत पदवी प्रमाणपत्राचे मुळ शुल्क व विलंबशुल्क मिळून एकूण शुल्क **रु.५००/–** पेक्षा अधिक असणार नाही.)

४ **आवेदनपत्राची उपलब्धता** : विहीत नमुन्यातील आवेदनपत्र online लिंकवर **दिनांक २४ जून २०२४ पासून** उपलब्ध होतील. सदरील लिंक विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेतस्थळावर examination विभागाअंर्तगत Convocation Section मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

५ **पदवी प्रमाणपत्र शुल्क :–**

६ महाविद्यालयस्तरावर पदवी वितरण कार्यक्रमात उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी **रु.१८०/–**(पदवी प्रमाणपत्र शुल्क–रु.१५०/– नोंदणी शुल्क–रु.२०/– व आवेदनपत्र शुल्क रु १०/–)

७ प्रस्तुत विद्यापीठाअंर्तगत स्वायत्त महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसाठी उपस्थित राहुन पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी शुल्क रु.५१०/–( पदवी प्रमाणपत्र शुल्क रु. ५००/– व आवेदनपत्र शुल्क रु १०/–) राहील.

८ **आवेदनपत्र दाखल करणे** : आवेदनपत्र (फॉर्म) संबधीत महाविद्यालयात/ संकुलामध्ये दाखल करता येईल.

९ **आवेदनपत्र दाखल करण्याचा दिनांक : दि २४ जून २०२४ ते २३ जुलै २०२४** पर्यत विहीत शुल्कासह व **दिं २४ जुलै २०२४ ते १४ ऑगस्ट २०२४** विलंब शुल्कासह महाविद्यालय व विद्यापीठाशी संबधित संकुलाच्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ संकुलात आवेदनपत्र दाखल करता येईल.

**टीप :**

१० प्रस्तुत विद्यापीठ संकुलातील पदविका, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थी व पीएच.डी. धारक विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून प्रमाणपत्र घेण्यासाठी आवेदनपत्र सादर केलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांचे पदवी प्रमाणपत्र दीक्षांत समारंभातच घेणे आवश्यक आहे. दीक्षांत समारंभानंतर पदवी प्रमाणपत्र घेणा—या विद्यार्थ्यांसाठी **रु.५०/—** विलंब शुल्क आकारण्यात येईल.

११ महाविद्यालयात पदवी आवेदनपत्र दाखल केलेल्या विद्यार्थ्यांना पदवी/पदविका प्रमाणपत्र महाविद्यालयस्तरावर संपन्न होणा—या पदवी वितरण कार्यक्रमातच देण्यात येतील.

१२ पदवी आवेदनपत्रावर आवश्यक ती पूर्ण माहिती भरलेली असावी. अर्धवट किंवा चूकीच्या पध्दतीने भरलेले आवेदनपत्र रद्द समजले जातील. रदद झालेल्या आवेदन पत्रा बाबत आपणास वेगळे कळविण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

१३ पदवी आवेदनपत्रावर विहीत ठिकाणी विद्यार्थ्याच्या स्वाक्षरी व फोटो लावून साक्षांकन केलेले असणे अनिवार्य आहे. फोटो हा पासपोर्ट साईजचा व फोटो चा Background हा पांढ—या रंगाचाच असावा अन्यथा फोटो व्यवस्थित प्रिंट होणार नाही (फोटो हा पदवी प्रमाणपत्रावर प्रिंट होणार असल्याने साक्षांकन न करता फोटोची एक कॉपी आवेदन पत्रावर लावावी.)

१४ पदवी आवेदनपत्रासोबत संबधीत परीक्षेच्या गुणपत्रिकेच्या सर्व साक्षांकीत छायाप्रती जोडलेल्या असाव्यात.

१५ बी. फार्मसी च्या पदवी आवेदनपत्रासोबत किमान एक महिना कालावधीचे प्रशिक्षण पूर्ण केल्याचे सर्टीफिकेट जोडलेले असावे, (ट्रेनिंग सर्टीफिकेट)

१६ गुणवत्ता सुधारणा करणा—या (Improvement) विद्यार्थ्यांच्या पदवी आवेदनपत्रासोबत सुधारणा (Improvement)केलेल्या व त्यापूर्वीच्या पूर्ण गुणपत्रिकेच्या छायांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे तसेच यापूर्वी पदवी प्रमाणपत्र घेतलेले असेल तर ते मुळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठात जमा करणे आवश्यक आहे.ज्या विद्यार्थ्यांनी पूर्वी पदवी प्रमाणपत्र घेतलेले नाही त्यांनी यापूर्वी संबधीत परीक्षेचे पदवी प्रमाणपत्र घेतले नाही, असा आवेदनपत्रावर उल्लेख करावा.

१७ जे विद्यार्थी वरीलप्रमाणे परीपत्रकानुसार विहीत कालावधीत आवेदनपत्र सादर करणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभानंतर रु.२००/— शुल्क व प्रतिवर्ष विलंब शुल्क रु.५०/— भरुन (जास्तीत जास्त रु ५००/— भरुन) पदवी प्रमाणपत्र घेता येईल.

१८ **जे विद्यार्थी हिवाळी २०२३ च्या पूर्वी उत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील दीक्षांत कक्षात रु.२००/— शुल्क व प्रतिवर्ष विलंब शुल्क रु.५०/— भरुन पदवी आवेदनपत्र सादर करावीत** व पदवी प्रमाणपत्र हस्तगत करावे. (अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत पदवी प्रमाणपत्राचे मुळ शुल्क व विलंब शुल्क मिळून एकूण शुल्क **रु.५००/—** पेक्षा अधिक असणार नाही.) हिवाळी २०२३ पूर्वीच्या विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभाच्या वेळी पदवी प्रमाणपत्र दिले जाणार नाही. समारंभानंतर पदवी मिळेल.

१९ महाविद्यालयात किंवा विद्यापीठाच्या दीक्षान्त कक्षात पदवी आवेदनपत्र सादर केल्यानंतर विद्यार्थ्यांना शुल्क भरल्याची पावती देण्यात येईल. **ही पावती दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र घेतांना सोबत असणे व कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पदवी प्रमाणपत्र मिळणार नाही.**

२० ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वीच दीक्षांत समारंभात उपस्थित राहुन पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी पदवी आवेदन पत्र सादर केलेले आहे पण अद्यापपर्यंत पदवी प्रमाणपत्र घेतलेले नाही अशा विद्यार्थ्यांनी आपले पदवी प्रमाणपत्र प्रस्तुत विद्यापीठातील दीक्षांत कक्षाच्या खिडकी वरून दीक्षांत समारंभानंतर स्वतः हस्तगत करावे. सबब, वरील प्रमाणे नोंद घेवुन सर्व संबधितांनी कार्यवाही करावी, ही विनंती.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**